महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, पुणे
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
सावित्रीबाई फुले विद्यापीठ रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६
दुरध्वनी क्र. ०२० २५६७६८१८, २५५५९२०० Email:-
principal.gppune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.शातंपु/विवि/महाडीबीटी/सूचना/१०५६ दि. 05 MAR 2022

## सूचना

शैक्षणिक वर्ष सन 2021-22 मध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, प्रवेशपत्रातील (CAP) प्रवर्गाप्रमाणे (Category – Caste) सवलत देण्यात आली आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज भरावा. **https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर नवीन नोंदणी करताना खालील प्रमाणे कार्यवाही करावी.**

1 https://mahadbtmahait.gov.in → Post matric Scholarship → New Applicant Registration → Applicant Login → Complete your Profile → My Applied Scheme → Apply Scheme.

2. विद्यार्थ्यांचे आधारकार्ड हे बँकेशी व मोबाइल क्रमांकाशी ( पालकांचा मोबाइल क्रमांक चालू शकेल) लिंक असणे आवश्यक आहे. नसल्यास, महाडीबीटी च्या संकेतस्थळावर बँक खात्याशी आधार कसे लिंक करावयाचे या बाबतची प्रक्रिया व त्यासाठी करावयाचा अर्जाचा नमुना देण्यात आला आहे.

3. विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रवर्गाप्रमाणे (Category – Caste) व पालकांच्या वार्षिक उत्पन्नाप्रमाणे शिष्यवृत्तीची योजना निवडावी व अर्ज भरताना कोणत्या कागदपत्रांची आवश्यकता आहे याची यादी सोबत जोडली आहे. तसेच उपरोक्त माहिती संकेतस्थाळावर उपलब्ध आहेत.

4. https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर अर्ज भरताना सर्व कागदपत्रांच्या मुळ प्रती स्कॅन करुन अपलोड कराव्यात. तसेच fees paid मध्ये 00/- एवढी रक्कम टाकण्यात यावी. तसेच Course Type Aided निवडण्यात यावा. ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी अर्ज भरला आहे त्यांनी अर्जांचे नूतनीकरण करावे व नूतनीकरणाचा क्रमांक (Application Id) मागील वर्षाचा टाकावा.

**दि. 07/03/2022** पर्यंत **अनुसूचित जातीच्या (SC)** विद्यार्थ्यांनी आपला शिष्यवृत्तीचा अर्ज उपरोक्त संकेतस्थळावर भरण्यात यावा. तसेच **इतर प्रवर्गातील** विद्यार्थ्यांनी **दि. 31/03/2022** पर्यंत आपला शिष्यवृत्तीचा अर्ज उपरोक्त संकेतस्थळावर भरण्यात यावा. जे विद्यार्थी अर्ज भरणार नाहीत, त्याना प्रवेशाच्यावेळी देण्यात आलेली सवलत वसूल करण्यात येईल. विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास स्वत: जबाबदार राहील याची नोंद घ्यावी. तसेच वेळोवेळी https://mahadbtmahait.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली मुदतवाढ विद्यार्थ्यांनी पहाणे आवश्यक आहे.

4/3/2022
(डॉ.विठ्ठल श्रीरंग बांदल)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,पुणे.

प्रत – 1. सर्व विभागप्रमुख, यांना कळविण्यात येते की, सदर सूचना आपल्या विभागातील सर्व विद्यार्थ्यांना निदर्शनास आणून द्यावी.
2. विभाग प्रमुख संगणक त्यांना विनंती करण्यात येते की, 15 जानेवारी 2022 पर्यंत संस्थेच्या संकेतस्थळावर कृपया प्रसिध्द करण्यात यावी.

Scanned by CamScanner